## नमुना भाग १

# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

क्र.उजि/भूसं/मुं.श/सा.प.नि./जाहिरात/२८९/२०१९ उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर,यांचे कार्यालय पहिला मजला, डी. डी. इमारत, जुने जकात घर, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -०१

दिनांक. २८/०५/२०१९

ज्या अर्थी बृहन्मुंबई महानगरपालिका, त्यांचेकडील पत्र क्र.डीबायसीएचई/५८१६/(बीपी)सिटी दिनांक १६/०२/२०१९ अन्वये आणि मे. सैफी बुरहानी अपलिफ्टमेंट ट्रस्ट, यांचेकडील दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये भेंडी बाजार पुनर्विकास संदर्भात शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२/०५/२०१५, शासन निर्णय क्र.०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक ३०/०९/२०१५ व शासन निर्णय क्र. संकीर्ण ०४/२०१६/प्र.क्र.४९ /अ-२ दिनांक २६/०५/२०१६ रोजी मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, यांचे नावे घेणेकामी प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी नगर विकास विभाग, यांचेकडील पत्र क्र. टीपीबी-४३१५/११६६/प्र.क्र.१८०/२०१५/न वि-११ दिनांक २२/०४/२०१९ आणि महसूल व वन विभाग यांचे कडील पत्र क्र. संकिर्ण-०३/२०१९/प्र.क्र.२१ (भाग-१)/अ-२ दिनांक २४/०५/२०१९ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, करिता भूसंपादनाची आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.

अर्थी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील आदेश क्र. उ.जि./भू.सं./मुं.श./ सै.बु.अ.ट्र/आदेश/२८६/२०१९ दिनांक २७/०५/२०१९ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर यांना निर्देश दिलेले आहेत.

त्याअर्थी

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, सुषमा सातपुते उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) मुंबई शहर याव्दारे

(एक) अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदीने घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत **भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३,** मधील कलम २६ ते ३० व या कायद्याच्या अनुसूची १ च्या तरतूदीनुसार संबंधित जमिनींसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे भेंडी बाजार पुनर्विकासकरीता मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरीत्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागबित आहे.

२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) मुंबई शहर, यांचेकडे दाखल करावीत.

३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर, यांचे कार्यालय पहिला मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट, प्राधिकृत अधिकारी ईजी हॉल, तळ मजला, ४७/४९ राऊदत तहेरा स्ट्रीट, भेंडी बाजार, मुंबई-४०० ००३ यांच्या कार्यालयात भूधारकांना उपलब्ध राहील.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर, तसेच प्रकल्प अधिकारी मे. सैफी बुरहानी अपलीफ्टमेंट ट्रस्ट,या कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### अनुसूची - एक
### खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील
### जिल्हा- मुंबई शहर

| अ.क्र. | गावाचे नाव | भूकर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | भुलेश्वर | ३६७७ पैकी | १४०.४७ |
| २ | | ४१७० पैकी | ८११० |
| ३ | | ४१९३ पैकी | १२६.०१ |
| ४ | | ४२२४ पैकी | ८३.६१ |
| ५ | | ४२२५ पैकी | ११६.२२ |
| ६ | | ४२२६ पैकी | ८३.६१ |
| ७ | | ४२४० पैकी | ९५.९७ |
| ८ | | ४२४२ पैकी | १०९.५३ |
| ९ | | ४२५५ पैकी | १६४.७१ |
| १० | | ४२६० पैकी | १६३.८८ |
| ११ | | ४२७० पैकी | ७६.९२ |

| अ.क्र. | गावाचे नाव | भूकर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|---|
| १२ | | ४२७४ पैकी | ३१६.०५ |
| १३ | | ४२७६ पैकी | ५०.१७ |
| १४ | | ४२७७ पैकी | ४६.६४ |
| १५ | | ४२७८ पैकी | १०२.८४ |
| १६ | | ४२९५ पैकी | २३६.६२ |
| १७ | | ४२९६ पैकी | २५९.२० |
| १८ | | ४२९७ पैकी | १८२.२७ |
| १९ | | ४२९९ पैकी | २२२.४१ |
| २० | | ४३३७ पैकी | ७१.९१ |
| २१ | | ४३३८ पैकी | ९०.३० |
| २२ | | ४३३९ पैकी | १७८.९३ |

सही/-

**सुषमा सातपुते,**

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर**

डीजीआयपीआर/२०१९/२०२०/३०६